Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य./उ.मा./परीक्षा/ 1772
दिनांक :- 28/08/2024

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या गुणपत्रिकांबाबत...**

आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका आणि तपशिलवार गुण दर्शविणारे माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख संबंधित वितरण केंद्रावर सोमवार दि.02/09/2024 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे.

1. प्रथमत: आपणास प्राप्त झालेल्या सर्व गुणपत्रिका माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका प्राप्त न झालेस मंडळ कार्यालयास दि.06/09/2024 अखेर लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर प्राप्त तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

2. सर्व गुणपत्रिकांवर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर गुणपत्रिकांवरील नोंदी उदा.विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ. माहिती माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका वितरीत करण्यात यावी.

3. गुणपत्रिकांमध्ये काही त्रूटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.01/10/2024 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत-

अ) प्रती गुणपत्रिकेतील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन गुणपत्रिकेसाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.

ब) माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची मुख्याध्यापक/ प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत

क) दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित मुख्याध्यापक/ प्राचार्य व लिपिक यांचा मा.विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

4. आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत गुणपत्रिका दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

5. जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस श्रेणी सुधार योजने अंतर्गत (Class Improvement) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.01/10/2024 अखेर विकल्प देणे अनिवार्य राहिल. तसेच दि.01/03/2025 अखेर जादा शुल्क आकारुन विकल्प स्विकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल. विकल्पाचा नमुना फॉर्म या परिपत्रकासोबत जोडला आहे.

**जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस श्रेणी सुधार योजने अंतर्गत** (Class Improvement) **प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारस पत्रासह विकल्प फॉर्म आणि पूर्वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका मंडळ कार्यालयास सादर केल्यानंतरच जुलै-ऑगस्ट 2024 ची मूळ गुणपत्रिका हस्तपोहोच देण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**